February 10th, 2020

| | |
|---|---|
| BSE Limited<br>Phiroze Jeejeebhoy Towers<br>Dalal Street<br>Mumbai - 400001<br><br>**Ref. Scrip Code : 539351** | National Stock Exchange of India Ltd.,<br>Exchange Plaza, C-1, Block G,<br>Bandra Kurla Complex,<br>Bandra (E)<br>Mumbai – 400051<br><br>**Ref: Symbol - PRABHAT** |

**Sub: Newspaper clippings of Board Meeting Notice published on 8th February, 2020 and 9th February, 2020**

**Ref : Regulation 47 (1) (d) of the SEBI (Listing of Obligations and Disclosures Requirements), 2015**

Dear Sir/ Madam,

Pursuant to the above mentioned regulation, we are enclosing herewith the newspaper clippings of Notice of Board Meeting, published in newspapers – Financial Express (English) and Kesari (Marathi), Ahmednagar editions on Saturday, February 8th, 2020 and Sunday, February 9th, 2020 respectively.

Kindly take the same on your records.

Thanking you,

Yours faithfully,
**For Prabhat Dairy Limited**

Dipti Todkar

**Company Secretary**

PRABHAT DAIRY LTD.



Scanned by CamScanner



# त्रिंबकपूर शाळेचा शिक्षणक्षेत्रात आगळावेगळा आदर्श : खामकर



**देवळाली प्रवरा (वार्ताहर)** : त्रिंबकपूर येथील जि. प. प्राथमिक शाळा शिक्षणक्षेत्रातील आदर्श असून, येथील पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शिक्षणाचे ज्ञानमंदिर उभे राहिले आहे. हे तालुक्यासाठी एक आदर्श उदाहरण आहे, असे प्रतिपादन गटविकासाधिकारी गोविंद खामकर यांनी केले.

राहुरी तालुक्यातील त्रिंबकपूरच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब लटके होते.

यावेळी विद्यमान सदस्य सुनीता निमसे, रवींद्र आढाव, सुरेश निमसे, केशव शिंदे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रविंद्र मोरे, सरपंच बबन आढाव, उपसरपंच ताराचंद कलवार, केंद्रप्रमुख किसान माने, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब कोळसे उपस्थित होते.

खामकर म्हणाले, येथील पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शिक्षणाचे ज्ञानमंदिर उभे राहिले आहे. तालुक्यातील इतर शाळांनी त्रिंबकपूर शाळेप्रमाणे आदर्श शाळा निर्माण करावी.

त्रिंबकपूर शाळेच्या विविध उपक्रमांची दखल घेत शाळेला यावर्षीचा जिल्हास्तरीय गुरुकुल उपक्रमशील शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामस्थांनी मुख्याध्यापक सतिश अंधारे व उपाध्यापक सौ. पल्लवी अंधारे यांचा सत्कार केला. तसेच 'चला खेळूया' उपक्रमांतर्गत शाळेच्या ६ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धेसाठी निवड झाली. त्यांचा स्पोर्टस् ड्रेस, स्पोर्ट बूट, व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी चौथीचे विद्यार्थी श्रुतिका आढाव व प्रसाद कोळसे यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. यावेळी मुलांनी विविध कार्यक्रम सादर केले.

# शिवाजीराव काकडे लिखीत ग्रंथ भावी पिढीला प्रेरणादायी : डॉ. सबनीस




**शेवगाव (वार्ताहर)** : शेतकरी, गोरगरीब, कष्टकरी, श्रमजिवी वर्गास प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी आबासाहेब काकडे यांनी आयुष्यभर संघर्ष केला. सामान्य जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ते ध्येयवादाने समर्पित जीवन जगले. विषमतायुक्त व शोषणमुक्त समाजनिर्मितीसाठी त्यांनी घेतलेल्या कष्टाची नव्या पिढीला ओळख व्हावी यासाठी ज्येष्ठ नेते शिवाजीराव काकडे यांनी लिहिलेला 'आबासाहेब आणि मी' हा ग्रंथ पुढील पिढीसाठी प्रेरणादायक ठरेल, असा विश्वास ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केला.

'आबासाहेब आणि मी' या ग्रंथाचे लोकार्पण व काकडे विद्यालयाच्या नूतन इमारतीचा उद्‌घाटन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, जेष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर, आबासाहेबांच्या जीवनावरील 'लाल सूर्य' पुस्तकाचे लेखक पुंडलिक गवंडी, जि. प. सदस्या सौ. हर्षदा काकडे, प्रकाशक अरुण जाखडे, डॉ. टी. के. पुरनाळे, सौ. ललिता सबनीस आदी उपस्थित होते.

श्री. काकडे म्हणाले, आबासाहेबांचे कार्य जोपासण्याचा प्रयत्न या ग्रंथातून केलेला असून, तटस्थपणे जे खरे आहे तेच लिहिले आहे. संस्थेचा विकास वृद्धिंगत होत असल्याचा आपल्याला अभिमान असून, शैक्षणिक व साहित्यिक दृष्टीकोनातून हा आपला प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

ठाणे येथील अधीक्षक अभियंता प्रकाश मिसाळ, अमरावतीचे तहसीलदार संतोष काकडे, सनदी लेखापाल सपना कोळेकर, कृष्णा जाजू यांच्या हस्ते नूतन इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले. पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची मिरवणूक काढून त्यांचा नवीन इमारतीत जल्लोषात प्रवेश झाला.

## देसवडे येथील वाळूउपसा करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

**पारनेर (वार्ताहर)** : संगमनेर तहसील कार्यालयाकडून मिळालेल्या मातीमिश्रीत वाळू परवान्याच्या नावाखाली साकूर येथील वाळूतस्करांनी पारनेर तालुक्यातील देसवडे येथील वाडेकर वस्तीजवळ असणाऱ्या पात्रात जेसीबी, पोकलेनच्या मदतीने रात्रंदिवस वाळूउपसा करण्यात येत आहे. अवैध वाळूउपसा करणाऱ्या वाळूतस्करांवर महसूल विभागाने कारवाई करण्याची मागणी देसवडेचे सरपंच बाबासाहेब भोर यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, संगमनेर तालुक्याच्या हद्दीतील वाळूतस्करांनी साकूर येथील चौगुले नावाच्या शेतकऱ्याच्या खासगी क्षेत्रात ६०० ब्रास मातीमिश्रीत वाळू उपशाची परवानगी संगमनेर महसूल प्रशासनाकडून घेतली आहे. गेल्या ८ दिवसांपासून याठिकाणी वाळू वाहतूक केली जात आहे. परंतु या वाळूतस्करांनी पारनेर तालुक्याच्या हद्दीत असणाऱ्या मुळा नदीपात्रात आपला मोर्चा वळविला असून, देसवडे येथील वाडेकर वस्तीजवळील असणाऱ्या नदीपात्रातून जेसीबी, पोकलेनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूउपसा केला जात आहे. यासंबंधीचे पुरावे संगमनेर येथील महसूल विभागाला देऊनही कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मातीमिश्रीत परमिटच्या नावाखाली मुळा नदीपात्रातून हजारो ब्रास वाळूउपसा केला जात असून, यामुळे महसूल विभागाच्या लाखो रुपयांच्या महसुलास चुना लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुळा नदीपात्रात पारनेर–संगमनेर, पारनेर–राहुरी अशा २ तालुक्यांच्या हद्द असून, या हद्दीचा फायदा घेत वाळूतस्कर वाळूउपसा करत असल्याची माहिती पुढे आली आहे.

## शेवगावमध्ये उद्यापासून दासनवमी सोहळ्यास प्रारंभ

**शेवगाव** : येथील श्रीराम मंदिराध्ये उद्यापासून (सोमवार) दासनवमी उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला असून, तो दि. १७ पर्यंत चालेल, अशी माहिती श्रीराम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अरु गालफाडे यांनी सांगितली.

उत्सव कालावधीमध्ये चोथवे महाराज (नांदेडकर) यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ ते ७ मनाचे श्लोक, प्रदक्षिणा व ६ ते ९ दासबोध पारायण, ९ ते ११ संहिता पारायण वाचन, दुपारी ३.३० ते ६ तुकाराम चिक्षे यांचे भागवत कथा प्रवचन होईल. शुक्रवारी १० ते २ यावेळेत नगर येथील जनकल्या रक्तपेढीद्वारे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. दि. १७ रोजी सकाळी ८ ते १० श्रीमद् दासबोध ग्रंथ मिरवणूक सोहळा होऊन कार्यक्रमाची सांगता होईल.

## कत्तलखान्याकडे जनावरे घेऊन जाणारी मालमोटार पोलिसांच्या ताब्यात



**पाथर्डी (वार्ताहर)** : तालुक्यातील गोधन कत्तलखान्याकडे कत्तलीसाठी जात असल्याच्या संशयावरून काल (शनिवारी) पहाटे गोरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष दीपक महाराज काळे व सहकाऱ्यांनी शेवगाव रोडवर जनावरे भरलेली मालमोटार अडवून ती पुढील तपासासाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली.

याबाबत संबंधित मालमोटार चालकाकडून मालमोटारीमधील जनावरे ही साखर कारखान्यावर घेऊन जात असल्याचे सांगण्यात आले. परंतु मालमोटारीत भरलेले १५ बैल अत्यंत दाटीवाटीने व जखमी अवस्थेत असल्याने ते शेतकऱ्याचे नसून ते कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जात असल्याने संबंधित मालमोार चालकावर गुन्हा दाखल करून या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी काळे यांनी केली.

यावेळी उपाध्यक्ष सोमनाथ बंग, नामदेव जायभाय, पप्पू पालवे, ऋषिकेश पाथरकर, गोविंद बंग आदी उपस्थित होते.

यासंदर्भात सायंकाळपर्यंत कुठलाही गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. मालमोटारीमधील गोधनाची रवानगी पाथर्डी पोलिसांनी मढी येथील गोशाळेत केली असून, पुढील चौकशी सुरू आहे. संबंधित गोधनाच्या मालकांनी पोलिस ठाण्यात काल हजेरी लावली होती. याबाबत पाथर्डी पोलिस तपास करत आहेत.

# स्वच्छतेच्या कामात कुचराई झाल्यास कारवाईचा इशारा

**पाथर्डी (वार्ताहर)** : रस्त्यावर कचरा टाकणारे, बांधकाम साहित्याची वेळीच विल्हेवाट न लावणारे, प्लॅस्टीक पिशवीचा वापर करणारे, खासगी व्यक्तींच्या मोकळ्या असणाऱ्या जागामालकांना तेथे सफाई करण्यासाठीच्या तात्काळ नोटीसा काढाव्यात व नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी तसेच कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरदेखील कारवाई करण्याचा इशारा मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी दिला.

नुकत्याच विषय समित्यांच्या सभापतींच्या निवडी झाल्यानंतर काल आरोग्य समितीचे सभापती प्रविण राजगुरू व समिती सदस्यांच्या पुढाकारातून पालिका कार्यालयामध्ये आरोग्य विभागाची बैठक संपन्न झाली. यावेळी कोळेकर बोलत होते.

यावेळी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, सभापती प्रवीण राजगुरू, आरोग्य समितीचे सदस्य नामदेव लबडे, संगीता गट्टाणी, कार्यालयीन अधीक्षकआयुब सय्यद, आरोग्य विभागाचे प्रमुख नवनाथ आमले यांच्यासह मुकादम व ठेकेदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मागील काही दिवसांमध्ये काही ठराविक नागरिक अनेकदा आवाहन करूनदेखील स्वच्छतेसंदर्भात टाळाटाळ करत आहेत. घंटागाडीमध्ये कचरा न टाकता रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या, प्लॅस्टीक पिशव्यांचा वापर करणाऱ्या, बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकू न वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांवर तसेच मोकळ्या जागेवर जागामालकाने स्वच्छता करावी व नियमित देखभाल करून संरक्षक भिंत अथवा कठडे उभारावेत अन्यथा नियमाचे उल्लघन करणाऱ्यांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना कोळेकर यांनी दिल्या.

आरोग्य विभागातील सर्व संबधितांना स्वच्छतेसंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. आगामी काळामध्ये निश्चितच याबाबतीत सुधारणा होईल. नागरिकांनीदेखील काही अडचण असल्यास आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नगराध्यक्ष गर्जे यांनी केले.

**सर्वांच्या सहकार्याने शहर स्वच्छ करू**

स्वच्छतेसंदर्भात काही प्रमाणात नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्याची दखल घेऊन वेळेवर घंटागाडी शहराच्या सर्व भागांमध्ये पाठवण्यात येतील. यासह सार्वजनिक शौचालय व इतर समस्या निश्चितच दूर केल्या जातील. नादुरुस्त वाहने दुरुस्त करण्यात येतील. वेळोवेळी औषध, धूर व पावडर फवारणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी या कामी सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य समितीचे सभापती प्रवीण राजगुरू यांनी केले.

# कर्मवीर भाऊराव पाटलांचे कार्य अतुलनीय : आ. तांबे



**राहाता (वार्ताहर)** : विद्यार्थ्यांनी स्वतःचे शिक्षण घेण्यासाठी कुणावरही अवलंबून न रहाता कष्ट करुन शिक्षण घ्यावे, असे कर्मवीरांचे परखड विचार होते. शिक्षणप्रक्रियेत कधीही जातीभेदाला न जुमानता त्यांनी तत्कालिन सर्वधर्मीयांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. बहुजनांना घडवण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य अतुलनीय असल्याचे गौरोवोद्‌गार आ. डॉ. सुधीर तांबे यांनी काढले.

लोणीच्या रयत शिक्षण संकुलात केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी अटल टिकरिंग लॅबचे उद्‌घाटन व महसूलमंत्री बाळासाहेब थोरातांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या विविध स्पर्धांच्या पारितोषिकांचा वितरण समारंभ तांबे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षणसंस्थेचे जनरल बॉडी सदस्य एकनाथ घोगरे होते.

यावेळी डॉ. एकनाथ गोंदकर, शेखर बोन्डे, बाळासाहेब विखे, सुरेश थोरात, श्रीकांत मापारी, उत्तमराव आहेर, जनार्दन घोगरे, प्राचार्य जी. टी. गमे आदी उपस्थित होते.

आ. तांबे म्हणाले, कर्मवीरांनी घरोघरी शिक्षणाची गंगा पोहोचवण्याचे कार्य केले. कर्मवीरांनी सुसंस्कृत पिढी घडवण्यासाठी स्वत:चे जीवन समर्पित केले आणि आज तेच कार्य त्याच तळमळीने रयत शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष शरद पवार करत आहेत. अटल टिकरिंग लॅबच्या माध्यमातून विद्यार्थी मोठी क्रांती करतील व भविष्यात समाजाला दिशादर्शक ठरतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

थोरातांच्या वाढदिवसानिमित्त लोणी विद्यालयात विविध वक्तृत्व, निबंध, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## वाळूउपसा करणारे वाहन तहसील कार्यालयात न नेता पसार झाल्याने गुन्हा दाखल

**राहुरी (वार्ताहर)** : प्रवरा नदीपात्रातून अनधिकृतरित्या वाळूउपसा करणाऱ्या टेम्पो मालक व चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी तहसील कार्यालय येथे घेऊन येत असताना टेम्पो राहुरी येथे तहसील कार्यालय येथे न आणता पाथरे खुर्द येथूनच वाळूसह पळून गेला म्हणून सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल स्वतः तहसीलदार फसलोद्दीन शेख यांनी टेम्पो मालक रविंद्र धनवडे व त्याचा चालक यांच्याविरूद्ध फिर्याद दाखल केली.

राहुरी पोलिसांत स्वतः शेख यांनी दाखल केलेल्या फिर्यादीत म्हटले की, मालुंजे येथील प्रवरा नदीपात्रातून माहेगाव रस्त्यावर शुक्रवारी रात्री रविंद्र धनवडे (पूर्ण नाव माहिती नाही) टेम्पोवरील (MH २० G २४७०) चालक प्रवरा नदीपात्रातून वाळूचे उत्खनन करीत असताना तहसीलदारांनी वाळूने भरलेल्या टेम्पोवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी टेम्पो मालक रविंद्र धनवडे व अनोळखी टेम्पोचालक तहसील कार्यालय येथे घेऊन येत असताना यातील आरोपी व चालक यांनी वाळूने भरलेला टेम्पो (किंमत २ लाख) तहसील कार्यालयात न आणता तो पाथरे खुर्द रस्त्याने वाळूसह पळवून नेल्याने सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा राहुरी पोलिसांत दाखल केला असून, पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक राक्षे करीत आहे.

# गांधी जगाला कळाले, पण... : द्वादशीवार



**संगमनेर (वार्ताहर)** : देशातील हिंदू, मुस्लिम, विद्वान गरीब अशा सर्व स्तरांमधील जनतेचे गांधी नेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात सच्चाई होती. त्यामुळे एका शब्दावर देशवासीय काम करत होते. गांधी जगाला कळाले मात्र भारतीयांना समजावून सांगणे हे दुर्दैव असून, महात्मा गांधी जगातील निःशस्त्रपणे युद्ध जगणारे सर्वात मोठे व्यक्ती असल्याचे गौरवोद्‌गार जेष्ठ विचारवंत सुरेश द्वादशीवार यांनी केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात विद्यालयात महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विजय व्याख्यानमालेत पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आ. डॉ. सुधीर तांबे होते.

यावेळी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, सेक्रेटरी चंद्रकांत कडलग, प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील, रजिस्टर आचार्य बाबुराव गवांदे, प्रा. बाबा खरात, रंजना गवांदे, अशोक गुंजाळ, विठ्ठल शेवाळे, प्रा. विश्वनाथ भुजबळ, सौ. सुमित्रा दिड्डी, हिरालाल पगडाल आदी उपस्थित होते

द्वादशीवार म्हणाले, भारत हा बहुभाषिक व क्षेत्रफळाने मोठा असलेल्या देश आहे. जातीव्यवस्थेचा पगडा असताना देशप्रेम व प्रामाणिकपणामुळे संपूर्ण देश गांधीजींच्या पाठीशी उभा राहिला. मागील १०० वर्षांपासून त्यांच्या नावाची व विचारांची चर्चा जगात आहे. त्यांनी कधीही आपले विचार ग्रंथबद्ध केले नाहीत. त्यामुळे अनुयायांमध्ये पुढे विचारधारा बदलत गेल्या. कामगार व खेडी स्वयंपूर्ण करण्याचा विचार त्यांनी मांडून मार्क्सवादावर सर्वप्रथम वैचारिक विजय मिळवला.

आपले जीवन हाच देशवासीयांना संदेश देताना त्यांनी त्यागाचा आदर केला. इतर सर्व नेत्यांना मोठेपणा दिला. जीवनामध्ये त्यांनी कायम संघर्ष केला. असहकार आंदोलन, चले जाव चळवळ, मिठाचा सत्याग्रह याचबरोबर देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांचे संघर्षमय जीवन राहिले. निःशस्त्रपणे लढा देणाऱ्या गांधींच्यापश्चात गांधीवाद्यांनी संघर्ष न केल्याने तरुण त्यांच्यापासून दुरावला आहे. अनेकदा त्यांच्यावर टीका झाली. मात्र गांधीजींवर टीका करणे अत्यंत दुर्दैवी आहे. जगाला गांधीजी समजले मात्र भारतीयांना गाधींजी समजावून सांगावे लागत आहेत ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली

आ. तांबे म्हणाले, देश ७०० वर्षे गुलाम राहिला याचे कारण सदृढ समाजव्यवस्था निर्माण झाली नाही. पारंपारिक पद्धतीने धार्मिक व्यवस्थेवर समाज विभागत राहिल्याने परकियांची आक्रमणे झाली. आता मात्र धार्मिक ध्रुवीकरण थांबण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. सध्या देशामध्ये धार्मिक मुद्यांवर भेदभाव केला जात आहे. राष्ट्रीय एकात्मता हीच आपली खरी ताकद आहे.

**प्रभात डेअरी लिमिटेड**
CIN : L15203PN1998PLC013068
**नोंदणीकृत कार्यालय :** गट १२२, मु.पो.रांजनखोल, तालुका राहता, जिल्हा अहमदनगर–४१३७२०, महाराष्ट्र
दूरध्वनी क्र. ०२४२२–२६५९९५
**ई मेल :** investor@prabhatdairy.in **वेबसाइट :** www.prabhatdairy.in

**नोटीस**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४७ (१) (ए) सह रेग्युलेशन २९ (१) (ए) अनुसार नोटीस देण्यात येते की, कंपनीचे ३१ डिसेंबर २०१९ अखेर संपलेल्या तिमाही व नऊमाहीचे अ–लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष (कन्सॉलिडेटेड व स्टँडअलोन) मंजूर करून रेकॉर्डवर घेणे याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२० रोजी होणार आहे.

सदर सभेचा तपशील कंपनीच्या वेबसाइटवर : www.prabhatdairy.in आणि स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइटवरही : www.bseindia.com आणि www.nseindia.com उपलब्ध आहे.

**प्रभात डेअरी लिमिटेड** करिता
स्वा/–
**दीप्ती तोडकर**
कंपनी सेक्रेटरी

**ठिकाण : श्रीरामपूर**
**दिनांक : ७ फेब्रुवारी २०२०**

# जामखेडच्या पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता

**जामखेड (वार्ताहर)** : शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत ११७ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेला आ. रोहित पवारांच्या प्रयत्नाने प्रशासकीय मान्यता मिळाली असून, लवकरच या कामाला प्रारंभ होणार असल्याची माहिती आ. रोहित पवारांनी दिल्याने शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सुटणार असल्याची आशा नागरिकांत निर्माण झाली असून, वर्षानुवर्षे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या महिलांच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा उतरणार आहे.

गेल्या ४–५ वर्षांपासून तालुक्यात समाधानकारक पाऊस पडत नसल्याने शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भुतवडा तलावातील पाणीसाठा कमी पडत होता. उन्हाळ्यात अपुऱ्या पावसामुळे भुतवडा तलावही कोरडा पडत होता. परिणामी शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. सद्यस्थितीत शहराला महिन्यातून तीनदाच पाणीपुरवठा होत आहे. त्यासाठी शहराला पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरुपी मिटवा, अशी नागरिकांची मागणी होती.

तत्कालिन पालकमंत्री राम शिंदे यांनीही २ वर्षे नगरविकास खात्याकडे यासंदर्भात मागणी केली होती. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ६४ किलोमीटर लांबीची ११७ कोटीची पाणीपुरवठा योजना मंजूर करून दिली होती. परंतु नंतर ही योजना अडगळीत पडली होती.

५ वर्षे पालकमंत्री असूनही ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिंदे यांनी तत्वतः मान्यतेचा साधा कागद मतदारांना दाखवून केवळ दिखावा केला. पण त्या दिखाव्याला प्रत्यक्ष मूर्तस्वरूप आ. पवारांनी दिले. शहराला कायमस्वरूपी पाणी मिळावे म्हणून वेळोवेळी पाठपुरावा करून, तांत्रिकदृष्ट्या त्याचा सखोल अभ्यास करून आणि हे सर्व नियोजन करून अखेर पाणीपुरवठा योजनेच्या या कामास प्रशासकीय मान्यता मिळवली असून, कामाची लवकरच सुरुवात होणार असल्याने शहराची तहान भागणार आहे.

सद्यस्थितीत शहराला १० दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होतो. साधारण ५० हजार लोकसंख्या असणाऱ्या शहराचा पाणीप्रश्न आजतागायत ऐरणीवर होता. उन्हाळ्यात तर १५ ते २० दिवसानंतर पिण्याचे पाणी ग्रामस्थांना मिळत होते. मात्र आ. पवारांनी त्या पाणी संकटात स्वखर्चातून पिण्याच्या पाण्याचे टँकर तालुक्याला पोहोचवून प्रसंगी गावांची ५ महिने तहान भागवली.

जामखेड येथील पाणीपुरवठा योजनेला निधी मिळवून ही योजना कार्यान्वित करू, असा निवडणुकीच्या काळात दिलेला शब्द त्यांनी ततोतंत पाळला असून, याआगोदर असलेल्या सरकारच्या काळात महत्वपूर्ण असलेल्या जामखेड पाणीपुरवठा योजनेचा निवडणूक काळात केवळ फार्स केला गेला. परंतु प्रत्यक्षात मात्र यात कोणतेही काम झाले नव्हते. निवडणुकीच्या काळातच आ. पवारांनी मतदारसंघातील प्रश्न समजावून घेत ते प्रश्न सोडवण्यासाठी कायम पाठपुरावा केला आणि त्यांच्याच प्रयत्नातून शहरातील नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. या योजनेमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार नसून, टंचाई काळात येथे लागणाऱ्या टँकरच्या खर्चाचा सरकारी तिजोरीवर पडणारा बोजाही कमी होणार आहे.

खर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे



**कै. नितीन वेणूनाथ गोलेकर**
**वि. का. सेवा सह. संस्था मर्या., खर्डा**
असे नूतन नामकरण सोहळा रविवार दि. ०९.०२.२०२० रोजी संपन्न होत आहे.
– शुभहस्ते –
मा. आमदार रोहित (दादा) पवार
– शुभेच्छूक –
चेअरमन व्हा. चेअरमन सचिव
व सर्व संचालक मंडळ
कै. नितीन (बापू) मित्रमंडळ, खर्डा, ता. जामखेड